This PDF you are browsing now is a digitized copy of rare books and manuscripts from the Jnanayogi Dr. Shrikant Jichkar Knowledge Resource Center Library located in Kavikulaguru Kalidas Sanskrit University Ramtek, Maharashtra.

KKSU University (1997- Present) in Ramtek, Maharashtra is an institution dedicated to the advanced learning of Sanskrit.
The University Collection is offered freely to the Community of Scholars with the intent to promote Sanskrit Learning.

Website
https://kksu.co.in/

Digitization was executed by NMM

https://www.namami.gov.in/

Sincerely,

Prof. Shrinivasa Varkhedi
Hon'ble Vice-Chancellor

Dr. Deepak Kapade
Librarian

Digital Uploaded by eGangotri Digital Preservation Trust, New Delhi
https://egangotri.wordpress.com/

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

Checked 2012

M-2226

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक
हस्तलिखित संग्रह

दाखल क्र. M2226 विषय धर्मशास्त्र
नाव चरितालिकापूजासार्थकथासमुद्रित
लेखक / लिपीकार —
पृष्ठ 18 काळ — पूर्ण / अपूर्ण

M-2226

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अथ

॥ हरितालिकापूजासार्थकथा- ॥

प्रारंभः

M 2226

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्रीउमामहेश्वराभ्यां नमः ॥ ॥ अथभाद्रपदशुक्लतृतीयायांदाक्षि
णात्यशिष्टपरिगृहीतंहरितालिकाव्रतम् ॥ तच्चपरविद्धायांकार्यम् ॥ " मुहूर्तमात्रसत्त्वेपिदि
नेगौरीव्रतंपरे " इतिमाधवोक्तेः ॥ हरितालिकाव्रतसत्त्वेपुरस्कारेणापिपरविद्धग्रहणवचनाद्दि
वोदासीयेउदाहृतत्वाच्च ॥ ॥ तत्र व्रतविधिः--भाद्रपदशुद्धतृतीयायांप्रातस्ति
लामलककल्केनस्नात्वापट्टवस्त्रंपरिधाय मूर्तौप्राणप्रतिष्ठांकुर्यात् ॥ ॥ सुमुखश्चेत्या
दि० ॥ विष्णुर्विष्णुःश्रीम० ॥ एवंगुणविशेषणविशिष्टायांशुभपुण्यतिथौममआत्मनः
पुराणोक्तफलप्राप्त्यर्थंममइहजन्मनिजन्मांतरेच समस्तपापक्षयपूर्वकसप्तजन्मराज्याखंडि
तसौभाग्यपुत्रपौत्रादिवृद्ध्येउमामहेश्वरदेवताप्रीत्यर्थं प्रतिवार्षिकविहितहरितालिकाव्रतां
गत्वेनयथाज्ञानेनयथामीलितषोडशोपचारैःपूजनमहकरिष्ये ॥ तत्रादौनिर्विघ्नतासिद्ध्यर्थं
महागणपतिपूजनंचकरिष्ये ॥ तथाच आसनविधिंकलशाराधनंघंटापूजनंचकरिष्ये ॥
वक्रतुंड०इतिमंत्रेणगणेशपूजनम् ॥ अपसर्पंतुतेभूताइत्यासनविधिंकृत्वा ॥ कलशस्यमु

१

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

खेविष्णुः० इतिकलशपूजनम् ॥ आगमार्थंतुदेवानामित्यादिघंटापूजनंचकुर्यात् ॥ ततः
अपवित्रःपवित्रोवा० इतिमंत्रेणपूजाद्रव्याणिसंप्रोक्ष्य आत्मानंचप्रोक्ष्य ॥ ॥ अथध्या
नम् ॥ ॥ पीतकौशेयवसनांहेमाभांकमलासनाम् ॥ भक्तानांवरदांनित्यंपार्वतींचिंत
याम्यहम् ॥ विधायवालुकालिंगमर्चयंतींमहेश्वरम् ॥ पूर्णेंदुवदनांध्यायेद्धरितालींवरप्र
दाम् ॥ १ ॥ मंदारमालाकुलितालकायैकपालमालांकितशेखराय ॥ दिव्यांबरायैचदि
गंबरायनमःशिवायैचनमःशिवाय ॥ श्रीउमामहेश्वराभ्यांनमः ध्यायामि ॥ देविदेवि
समागच्छप्रार्थयेहंजगन्मये ॥ इमांमयाकृतांपूजांगृहाणसुरसत्तमे ॥ श्रीउमामहेश्वरा
भ्यां० आवाहयामि ॥ भवानित्वंमहादेविसर्वसौभाग्यदायिके ॥ अनेकरत्नसंयुक्तमा
सनंप्रतिगृह्यताम् ॥ श्रीउमामहेश्वरा० ॥ आसनंसम० ॥ सुचारुशीतलंदिव्यंनानागंधसम
न्वितम् ॥ पाद्यंगृहाणदेवेशिमहादेविनमोऽस्तुते ॥ श्रीउमाम० ॥ पाद्यंस० ॥ श्रीपार्व
तिमहाभागेशंकरप्रियवादिनि ॥ अर्घ्यंगृहाणकल्याणिभर्त्रासहपतिव्रते ॥ श्रीउमाम०

अर्घ्यंस० ॥ गंगाजलंसमानीतंसुवर्णकलशेस्थितम् ॥ आचम्यतांमहाभागेरुद्रेणसहितऽनघे
॥ श्रीउमामहेश्वरा० ॥ आचमनीयंसमर्प० ॥ दध्याज्यमधुसंयुक्तंमधुपर्कंमयाऽनघे ॥ दत्तंगृ
हाणदेवेशिभवपाशविमुक्तये ॥ श्रीउमाम० ॥ मधुपर्कंसमर्प० ॥ गंगासरस्वतीरेवापयोष्णी
नर्मदाजलैः ॥ स्नापिताऽसिमयादेवितथाशांतिंकुरुष्वमे ॥ श्रीउमामहेश्वरा० ॥ मलापकर्ष
स्नानंस० ॥ सौरभेयंमहद्दिव्यंपवित्रंपुष्टिवर्धनम् ॥ स्नानार्थंतेमयादत्तंदुग्धंगृण्हीष्वतेनमः ॥
श्रीउमामहे० ॥ पयःस्नानंस०॥ स्नानानंतरंशुद्धोदकस्नानंस० सकलपूजार्थेअक्षतान्स० ॥
जगदेतद्दधासित्वंत्वमेवजगतांहितम् ॥ दधिवामनरूपेणदधिस्नानायगृह्यताम् ॥ श्रीउ
मामहे० दधिस्नानंसमर्पया० दधिस्नानानं० ॥ घृतकुंभसमायुक्तंघृतयोने घृतप्रिये ॥
घृतभुग्घृतधामासिघृतंस्नानाय गृह्यताम् ॥ श्रीउमामहे० ॥ घृतस्नानंस० घृतस्नानं० ॥
सर्वौषधिसमुत्पन्नंपीयूषदृशंमधु ॥ स्नानायेतमयादत्तंगृहाणपरमेश्वरि ॥ श्रीउमामहेश्वरा० ॥
मधुस्नानंसमप० मधुस्नानानं ॥ इक्षुदंडसमुत्पन्नारस्यास्निग्धतराशुभा ॥ शर्करेयंसमादत्ता

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ह० २

स्नानार्थंप्रतिगृह्यताम् ॥ श्रीउमाम० शर्करास्नानंस० शर्करास्नानानं० ॥ काश्मीरा गरुकस्तूरीकर्पूरमलयान्वितम् ॥ उद्धर्तनंमयादत्तंगृह्यतांपरमेश्वरि ॥ श्रीउमाम० ॥ उद्धर्तनंस० ॥ कर्पूरैलाकुंकुमादिसुगंधिद्रव्यसंयुतम् ॥ गंधोदकमुमेशुद्धंस्नानार्थंप्रतिगृह्य ताम् ॥ श्रीउमाम० ॥ गंधोदकस्नानंस० गंधोदकस्नानानंतरंशुद्धोदकस्नानंसमर्पयामि आचमनंस० ॥ ततः श्रीउमामहेश्वराभ्यांनमइति गंधादिनासंपूज्य उत्तरेनिर्माल्यं विसृज्य ॥ किरणाधूतपापाचपुण्यतोयासरस्वती ॥ मणिकर्णिजलंशुद्धंस्नानार्थंप्रतिगृह्य ताम् ॥ महिम्नःपारंते० इतिस्तोत्रेणमहाभिषेकंकुर्यात् ॥ श्रीउमामहेश्वराभ्यांनमः अभि षेकस्नानंसमर्पयामि ॥ अभिषेकस्नानानंतरंआचमनीयंस० ॥ सर्वभूषाधिकेसौम्येलोक लज्जानिवारणे ॥ मयोपपादितेतुभ्यंवाससीप्रतिगृह्यताम् ॥ श्रीउमा० ॥ वस्त्रोपवस्त्रंस० मंत्रमयंमयादत्तंपरब्रह्ममयंशुभम् ॥ उपवीतमिदंसूत्रंगृहाणजगदंबिके ॥ श्रीउमाम० ॥ उपवीतंस० ॥ कुंकुमागरुकर्पूरकस्तूरीचंदनैर्युतम् ॥ विलेपनंमहादेवितुभ्यांदास्यामिभ

पू० २

क्तितः ॥ श्रीउमाम० ॥ चंदनंस० ॥ रंजिताःकुंकुमौघेनअक्षताश्चातिशोभनाः ॥ भक्त्या समर्पितास्तुभ्यंप्रसन्नाभवपार्वति ॥ श्रीउमाम० ॥ अक्षतान्स० हरिद्राकुंकुमंचैवसिं दूरंकज्जलान्वितम् ॥ सौभाग्यद्रव्यसंयुक्तंगृहाणपरमेश्वरि ॥ श्रीउमायैनमः ॥ सौभाग्य द्रव्याणिस० ॥ (अथवासौभाग्यद्रव्याणांसमर्पणेपृथक्पृथक्मंत्रायोज्याः ॥ ते यथा- नवरत्नादिभिर्बद्धांसौवर्णेनचतंतुभिः ॥ निर्मितांकंचुकींभक्त्यागृहाणपरमेश्वरि ॥ श्रीउ मायैनमः कंचुकींसम० ॥ पट्टसूत्रभवंदिव्यंस्वर्णापूर्णाकृतियुतम् ॥ सौमंगल्याभिवृ द्ध्यर्थंकंठसूत्रंददामिते ॥ श्रीउमायैनमः ॥ कंठसूत्रंस० ॥ ताडपत्राणिदिव्यानिविचित्रा णिशुभानिच ॥ कराभरणयुक्तानिगौरित्वंप्रतिगृह्याताम् ॥ श्रीउमायैनमः ॥ ताडपत्रंस० ॥ हरिद्रारंजितादिव्यासुखभौभाग्यसंपदा ॥ अतस्त्वांपूजयिष्यामिगृहाणपरमेश्वरि ॥ श्री उमायैनमः ॥ हरिद्रांसमर्पयामि ॥ कुंकुमंकामदंदिव्यंकामिनीकामसंभवम् ॥ कुंकुमेना र्चितेदेविसौभाग्यंप्रतिगृह्यताम् ॥ श्रीउमायैनमः ॥ कुंकुमंसम० ॥ सुनीलभ्रमराभासं

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कज्जलंनेत्रमंडनम् ॥ मयादत्तमिदंभक्त्याकज्जलंप्रतिगृह्यताम् ॥ श्रीउमायैन० ॥ कज्जलं
सम० ॥ विद्यदरुणसंकाशंजपाकुसुमसन्निभम् ॥ सिंदूरादिप्रदास्यामिसौभाग्यंदेहिमेचि
रम् ॥ श्रीउमायैनमः ॥ सिंदूरंस० ॥ स्वभावसुंदरांगीत्वंनानारत्नादिभिर्युता ॥ भूषणानि
विचित्राणिप्रीत्यर्थंप्रतिगृह्यताम् ॥ श्रीउमाम० ॥ आभरणानि ॥) नानासुगंधिकंद्रव्यं
चूर्णीकृत्वाप्रयत्नतः ॥ ददामितेमहादेविप्रीत्यर्थंप्रतिगृह्यताम् ॥ श्रीउमाम० ॥ नानापरि
मलद्रव्यंसमर्पयामि ॥ करवीरैर्जातिकुसुमंश्चपैकबकुलैःशुभैः ॥ शतपत्रैश्चकल्हारैरर्चयेत्
परमेश्वरि ॥ सेवंतिकाबकुलचंपकपाटला०जैःपुन्नागजातिकरवीररसालपुष्पैः ॥ बिल्वप्र
वासतुलसीदलमालतीभिस्त्वांपूजयामिजगदीश्वरिमेप्रसीद ॥ नानाविधानिपुष्पाणिअ
नेकैःपुष्पजातिभिः ॥ मयासमर्पितानित्वंगृहाणपरमेश्वरि ॥ श्रीउमामहे० ॥ पुष्पाणि०
॥ अथांगपूजा ॥ ॥ उमायैनमः पादौपूजयामि ॥ गौर्यैन० गुल्फौपू० ॥ पार्वत्यै०
जानुनीपू० ॥ जगद्धात्र्यै० जंघेपू० ॥ जगत्प्रतिष्ठायै० ऊरूपू० ॥ शांतिरूपिण्यै०

कटीपू० ॥ हरायै० गुह्यंपूज० ॥ माहेश्वर्यै० नाभिंपू० ॥ शांभव्यै० हृदयंपू० ॥ शू
लपाण्यै० कंठंपू० ॥ पिनाकधृषे० बाहूपू० ॥ शिवायै० मुखंपू० ॥ पशुपतिप्रि
यायै०नेत्रेपू ॥ गंगायै० ललाटंपू० ॥ महालावण्यायै० शिरःपू० ॥ सच्चिदानंदरू
पिण्यै० सर्वांगंपू० ॥ अथ पत्रपूजा ॥ ॥ अशोकायैनमः अशोकपत्रंसमर्पयामि ॥
जगद्धात्र्यै० धात्रीप० ॥ माहेश्वर्यैन० दूर्वाप० ॥ कपर्दिन्यै० करवीरपद० ॥ कपालधा
रिण्यै० कदंबप० ॥ पार्वत्यै० ब्राह्मीप० ॥ धूर्जटायै० धत्तूरप० ॥ त्रिपुरांतकायै०
अपामार्गप० ॥ सर्वेश्वर्यै० नानाविधपत्राणिसमर्पयामि ॥ ॥ अथपुष्पपूजा ॥ ॥
चतुर्वर्गप्रदायैनमः चंपकपुष्पंस० ॥ बुद्धिप्रियायैन० केतकीपुष्पंस० ॥ कौमार्यैन० कर
वीरपु० ॥ कुमार्यैन० बकुलपुष्पंस० ॥ धनदायैनमः धत्तुरपुष्पंस० ॥ शांभव्यैनमः
शतपत्रपुष्पंस० ॥ चामुंडायै० पद्मपुष्पंस० ॥ जगद्धात्रयेनमः जपापुष्पंस० ॥ माहेश्व
र्यैनमः मल्लिकापुष्पंस० ॥ मेरुमांदारवासिन्यैनमः अशोकपुष्पंस० ॥ ॥ अथ नामपूजा ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

उमायैनमः ॥ कात्यायन्यैनमः ॥ गौर्यैनमः ॥ काल्यैनमः ॥ हिमवत्यैनमः ॥ शिवायै
नमः ॥ भवान्यैनमः रुद्राण्यैनमः ॥ सर्वमंगलायैनमः ॥ अपर्णायैनमः ॥ पार्वत्यै
नमः ॥ दुर्गायैनमः मृडान्यैनमः ॥ चामुंडायैनमः ॥ कौमार्यैनमः ॥ भगवत्यैनमः ॥
सरस्वत्यैनमः ॥ शारदायैनमः ॥ वागीश्वर्यैनमः ॥ चंडिकायैनमः ॥ अंबिकायैनमः ॥
आर्यायैनमः ॥ दाक्षायण्यैनमः ॥ गिरिजायैनयः ॥ मेनकात्मजायैनमः ॥ पद्मिन्यै
नमः ॥ पद्माकरवासिन्यैनमः ॥ महिषमर्दिन्यैनमः ॥ सिंहवाहिन्यैनमः ॥ शक्ति
दायैनमः ॥ ललितायैनमः ॥ ॥ त्रिदलंत्रिगुणाकारंत्रिनेत्रंचत्रियायुधम् ॥ त्रिजन्म
पापसंहारमेकबिल्वंशिवार्पणम् ॥ तुलसीबिल्वनिर्गुंडीजंबीरामलकंतथा ॥ पंचबिल्व
मितिख्यातमेकबिल्वंशिवार्पणम् ॥ (शिवाष्टोत्तरशतनाम भिर्बिल्वदलैः समर्चयेत्) ॥
श्रीउमाम० ॥ बिल्वपत्राणिस० ॥ देवद्रुमरसोद्भूतःकृष्णागरुसमन्वितः ॥ आनीतोयम
याधूपोभवानिप्रतिगृह्यताम् ॥ श्रीउमाम० धूपंस० ॥ त्वंज्योतिः सर्वदेवानांतैजसांतेज

उत्तमम् ॥ आत्मज्योतिःपरंधामदीपोयंप्रतिगृह्यताम् ॥ श्रीउमाम० दीपंस० ॥ अन्नंचतु
र्विधंचारुरसैःषड्भिःसमन्वितम् ॥ भक्ष्यभोज्यसमायुक्तंनैवेद्यंप्रतिगृह्यताम् ॥ श्रीउमामहे० ॥
अमुकनैवेद्यंसमर्पयामि प्राणायनमः ॥ ६ ॥ नमस्तेदेविदेवेशिसर्वतृप्तिकरंपरम् ॥ म
यानिवेदीतंतुभ्यंगृहाणजलमुत्तमम् ॥ श्रीउमामहे० ॥ मध्येपानियंस० ॥ पुनः प्राणा
यनमः ६ ॥ ऊत्तरापोशनंस० ॥ हस्तप्रक्षालनंस० ॥ मुखप्रक्षालनंस० ॥ आचमनीयं
स० ॥ मलयाचलससंभूतंकर्पूरेणसमन्वितम् ॥ करोद्वर्तनकंचारुगृह्यतांजगत्पते ॥ करौ
द्वर्तनार्थेचंदनंस० ॥ कर्पूरैलालवंगादितांबूलीदलसंयुतम् ॥ क्रमुकस्यफलंचैवतांबूलंप्र
तिगृह्यताम् ॥ श्रीउमाम० ॥ तांबूलंस० ॥ इदंफलंमयादेवस्थापितंपुरतस्तव ॥ तेनमे
सुफलावाप्तिर्भवेज्जन्मनिजन्मनि ॥ श्रीउमाम० ॥ फलंस० ॥ हिरण्यगर्भगर्भस्थंहेमबीजं
विभावसोः ॥ अनंतपुण्यफलदमतःशांतिंप्रयच्छमे ॥ श्रीउमाम० ॥ सुवर्णपुष्पदक्षिणां
स० ॥ वज्रमाणिक्यवैडूर्यमुक्ताविद्रुममंडितम् ॥ पुष्परागसमायुक्तंभूषणंप्रतिगृह्यताम् ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

श्रीउमाम० ॥ भूषणंस० ॥ चंद्रादित्याचैधरणीविद्युदग्निस्तथैवच ॥ त्वमेवसर्वज्योतीषि आर्तिक्यंप्रांतगृह्यताम् ॥ श्रीउमाम० ॥ नीराजनंस० ॥ कपूरार्तिक्यंचस० ॥ (सतिसं भवेराजोपचारार्पणम् ॥ तद्यथा-- स्तुतिभिःसहितंगीतंनर्मितंदिव्यमुत्तमम् ॥ नित्य शःकल्पितंभक्त्यागृहाणकरुणानिधे ॥ श्रीउमामहेश्वरा० ॥ गीतंस० ॥ विणातालमृदं गादिखंडभेरीचघंटिका ॥ दुंदुभिर्वेणुनादश्चश्रूयतांसुरसत्तमे ॥ श्रीउमाम० ॥ वाद्यंस० उभयोश्चरणेबद्धाक्षुद्रघंटाःसुभक्तितः ॥ तुष्ट्यर्थंसर्वदेवानांकृत्यंनृत्यंविलोकय ॥ श्रीउमा म० ॥ नृत्यंसमर्प० ॥ हरिन्मणिगणाबद्धदंडशक्तिकरप्रभम् ॥ सुवर्णछत्रंशोभाढ्यंगृहा णकरुणानिधे ॥ श्रीउमाम० ॥ छत्रं० ॥ सुवेणुदंडसंयुक्तंचमर्याःकेशसंयुतम् ॥ चामरं कल्पितंभक्त्यागृहाणसुरसत्तमे ॥ श्रीउमाम० ॥ चामरंस० ॥ सवितृ किरणस्पर्धिस्फुर त्किरणमंडलम् ॥ आदर्शमणिभिर्युक्तंप्रतिरूपंविलोकय ॥ श्रीउमाम० ॥ दर्पणंस० ॥ प्रवालनालसद्गात्रेमुक्तामणिविभूषिते ॥ पट्टसूत्रमयेदेविमंचकेशयनंकुरु ॥ श्रीउमाम०

मंचकंस० ॥ उशीरनिर्मितंदिव्यंहेमदंडसमन्वितम् ॥ व्यजनंचमयादत्तंगृहाणपरमेश्व रि ॥ श्रीउमा० ॥ व्यजनंस० ॥ सर्वराजोपचारान्कल्पयामि) ॥ नमःसर्वहितार्थायजगदा धारहेतवे ॥ उमाकांतायशांतायशंकरायनमोनमः ॥ श्रीउमाम० ॥ नमस्कारंस० ॥ यानि कानिचपापानिब्रह्महत्यासमानिच ॥ तानिसर्वाणिनश्यंतुप्रदक्षिणपदेपदे ॥ श्रीउमाम० ॥ प्रदक्षिणांस० ॥ ॥ अथनामपूजा ॥ उमायैनमः ॥ गौर्यै० ॥ पार्वत्यै० ॥ जगद्धा त्र्यै० ॥ जगत्प्रतिष्ठायैनमः ॥ हरायै० ॥ महेश्वराय० ॥ शंभवेनमः ॥ शूलपाणये० ॥ पिनाकधृषे० ॥ शिवाय० ॥ पशुपतये० ॥ महादेवाय० ॥ श्रीउमामहे० ॥ मंत्रपुष्पांज लिंसमर्प० ॥ अथ प्रार्थना ॥ हरितालिनमस्तेस्तुसशिवेभक्तवत्सले ॥ संसारभयभी ताहंत्वमेवशरणंमम ॥ जन्मजन्मनिसौभाग्यमक्षयंदेहिमेऽव्यये ॥ यशस्विनमुदारंच गांभीर्यादिगुणान्वितम् ॥ सदाचारपरंशांतंविष्णुभक्तिपरायणम् ॥ शिवभक्तिपरंचैववेद शास्त्रविशारदम् ॥ लक्ष्मीवंतंपुत्रवंतमारोग्यादिगुणान्वितम् ॥ भर्तारंदेहिमेदेविप्रीतिमंतं

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सदामयि ॥ तथापुत्रांश्चैपात्रांश्चकन्याश्चान्वयशोभिनीः ॥ धनधान्यादिसंपत्तिमैश्वर्यंरु
चिरंशिवे ॥ लक्ष्मींमनोरमांदेहिसुरूपाद्यखिलान्गुणान् ॥ धर्मबुद्धिंचमेदेहिपातिव्रत्य
मखंडितम् ॥ भोगान्सुविपुलानश्नुदिहलोकेपरत्रच ॥ त्वयिभक्तिंचमेदेहिभूशंभर्तरि
शंकरे ॥ संसारहारिणींबुद्धिमंतेदेहिनमोस्तुते ॥ तवसान्निध्यमेवास्तुममश्रीहरितालि
के ॥ यथात्वंदेवदेवेशिसौभाग्यादिसमन्विता ॥ तथामांकुरुसर्वेशिजन्मजन्मनिपार्वती ॥
आवाहनंनजाना० ॥ मंत्रहीनंक्रियाहीनं० ॥ अन्यथाश० ॥ गतंपापंगतं० ॥ रूपंपे
हि० ॥ श्रीउमाम० ॥ प्रार्थनांस० ॥ अनेनयथाज्ञानेनयथामीलितोपचारपूजनेनश्री
उमामहेश्वरौप्रीयेतांनमम ॥ अद्योपूर्वोच्चरितए० पुराणोक्तफलप्राप्त्यर्थं हरितालिकाव्र
तांगत्वेनपूजासांगतांसिद्ध्यर्थंब्राह्मणायवायनप्रदानंकरिष्ये ॥ तदंगंब्राह्मणपूजनंचकरि
ष्ये ॥ महाविष्णुस्वरूपिणेब्राह्मणायइदमासनम् स्वासनम् ॥ इदंपाद्यं ॥ सुपाद्यम् ॥
इदमर्घ्यं अस्त्वर्घ्यम् ॥ इदमाचमनीयं अस्त्वाचमनीयम् ॥ गंधाःपांतु सौमंगल्यंचास्तु ॥
अक्षताःपांतु आयुष्यमस्तु ॥ पुष्पाणिपांतु संश्रीयोऽस्तु ॥ तांबुलंपातु ऐश्वर्यमस्तु ॥

दक्षिणाःपांतु ॥ बहुदेयंचास्तु ॥ नमोस्त्वनंतायसहस्रमूर्तयेसहस्रपादाक्षिशिरोरुबाहवे ॥
सहस्रनाम्नेपुरुषायशाश्वतेसहस्रकोटीयुगधारिणेनमः ॥ इतिमंत्रेणअक्षतान्दद्यात् ॥ वाय
नदानमंत्रः ॥ उपायनमिदंदेवव्रतसंपूर्तिहेतवे ॥ वाणकंद्विजवर्यायसहिरण्यंददाम्यहम् ॥ १ ॥
अन्नंसुवर्णपात्रस्थंसवस्त्रफलदक्षिणम् ॥ वायनंगौरिविप्रायददामिप्रीतयेतव ॥ २ ॥ सौभाग्या
रोग्यकामानांसर्वसंपत्समृद्धये ॥ गौरीगिरीशतुष्ट्यर्थंवायनंतेददाम्यहं ॥ ३ ॥ विप्रायवेदवि
दुषेश्रोत्रियायकुटुंबिने ॥ नरकोत्तारणार्थायह्यच्युतःप्रीयतामिति ॥ ४ ॥ इदंअमुकवायन
प्रदानंसदक्षिणाकंसतांबूलंअमुकशर्मणेब्राह्मणायतुभ्यमहंसंप्रददे ॥ प्रतिगृह्यतां ॥ प्रतिगृ
ण्हाणि ॥ तेनश्रीउमामहेश्वरौप्रीयेताम् ॥ ॥ तस्मिन्नहनिकर्तव्यपूजनंरजनीमुखे ॥ अर्धरात्रे
उमाकांतस्यार्चनंजागरंचरेत् ॥ ततःप्रभातेपंचोपचारैः उत्तरपूजांकृत्वा ॥ यांतुदेवगणाःस
र्वेपूजामादायपार्थिवात् ॥ इष्टकामप्रसिद्ध्यर्थंपुनरागमनायच ॥ इतिमंत्रेणविसर्जनंकुर्यात् ॥

॥ इतिहरितालिकापूजासमाप्ता ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ शुभं भवतु ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अथकथा ॥ सूतउवाच ॥ मंदारमालाकुलितालकायैकपालमालांकितशेखराय ॥
दिव्यांबरायैचदिगंबरायनमःशिवायैचनमःशिवाय ॥ १ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ शौनकादि ऋषींप्रत हरितालिकाव्रतकथा सांगण्याकरितां सूत आरंभीं मंगल करितात मंदारवृक्षांच्या फुलांच्या माळांनीं जिचे केस सुशोभित आहेत व जिनें दिव्य वस्त्र परिधान केलें आहे अशी भगवती पार्वती आणि नरकपालमालांनीं युक्त आहे शिरोभूषण ज्यांचे व स्वतः दिगंबर असणारा असा जो भगवान् शंकर, त्या दोघांला (पार्वतीला व शंकराला) नमस्कार करितों ॥ १ ॥

कैलासशिखरेरम्येगौरीपृच्छतिशंकरम् ॥ गुह्यातगुह्यतरंगुह्यंकथयस्वमहेश्वर ॥ २ ॥

याप्रमाणें उमामहेश्वरांस वंदून सूत ह्मणतात, ऋषिहो, कोणे एके समयीं रम्य अशा कैलासपर्वताच्या शिखरावर पार्वती व शिव ही उभयतां आनंदानें बसलेली असतां पार्वती शिवाप्रत प्रश्न करिते कीं, हे महेश्वरा, सर्व गुह्यांहून गुह्य असें जें कांहीं असेल तें तुह्मा मला कृपा करून सांगा ॥ २ ॥

सर्वेषांसर्वधर्माणामल्पायासंमहत्फलम् ॥ प्रसन्नोसियदानाथतथ्यंब्रूहिममाग्रतः ॥ ३ ॥

कीं ज्याच्या योगानें सर्वांस सकल धर्मांचें महत्फल थोड्या श्रमानें मिळेल. हे प्रभो, जर तुह्मी मजवर प्रसन्न आहां, तर मुख्य गुह्य काय तें मला खरें सांगा ॥ ३ ॥

केनत्वंहिमयाप्राप्तस्तपोदानव्रतादिना ॥ अनादिमध्यनिधनोभर्ताचैवजगत्प्रभुः ॥ ४ ॥

आणि तुह्मी आदि, मध्य व अंत यांनीं रहित व सर्व जगाचे प्रभु असें असूनही मला पति मिळालां तरी कोणतें तप, दान, व्रतादि पुण्यकर्म केल्यानें मिळालेत तेंही मला सांगा ॥ ४ ॥

ईश्वरउवाच ॥ ॥ शृणुदेविप्रवक्ष्यामितवाग्रेव्रतमुत्तमम् ॥
यद्गोप्यंममसर्वस्वंकथयामितवप्रिये ॥ ५ ॥

याप्रमाणें गौरीचा प्रश्न ऐकून भगवान् शंकर ह्मणतात, हे देवि, तुला एक उत्तम व्रत सांगतों तें श्रवण कर; जें व्रत अत्यंत गुप्त असून केवळ माझें सर्वस्व आहे, ते प्रिये, मी तुला सांगतों ॥ ५ ॥

यथाचोडुगणेचंद्रोग्रहाणांभानुरेवच ॥ वर्णानांचयथाविप्रोदेवानांविष्णुरेवच ॥ ६ ॥

पहा कीं, जसा नक्षत्रांच्या समुदायांत चंद्र श्रेष्ठ, नव ग्रहांत सूर्य श्रेष्ठ, सर्व वर्णांत ब्राह्मण श्रेष्ठ, व सर्व देवांत विष्णु श्रेष्ठ ॥ ६ ॥

नदीषुचयथागंगापुराणानांचभारतम् ॥ वेदानांचयथासामइंद्रियाणांमनोयथा ॥ ७ ॥

व सर्व नद्यांत गंगा श्रेष्ठ,सर्व पुराणांत*भारत श्रेष्ठ,सर्व वेदांत सामवेद श्रेष्ठ, व जसें सर्व इंद्रियांत मन श्रेष्ठ

*भारताची अठरा पुराणांत गणना नाहीं;तथापि पुराण ह्मणजे प्राचीन कथानकें, असा अर्थ घेऊन येथें ह्मटलें आहें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पुराणवेदसर्वस्वमागमेनयथोदितम् ॥ एकाग्रेणशृणुष्वैतद्यथादृष्टंपुरातनम् ॥ ८ ॥

तसें सर्व व्रतांत हें व्रत उत्तम आहे; हें सर्व पुराणांचे व देवाचे रहस्य असून आगमांत यथासांग जसें वर्णिलें व जसें मीं पुरातन पाहिलें आहे, तसें मी तुला सांगतों; तें तूं एकाग्रमनानें श्रवण कर ॥ ८ ॥

येनव्रतप्रभावेणप्राप्तमर्धासनंमम ॥ तत्सर्वंकथयिष्येहंत्वंममप्रेयसीयतः ॥ ९ ॥

ज्या व्रताच्या प्रभावानें तुला माझें अर्धासन मिळालें तें सर्व व्रत तूं माझी अत्यंत आवडती आहेस ह्मणून तुला मी सांगतों ॥ ९ ॥

भाद्रेमासिसितेपक्षेतृतीयाहस्तसंयुता ॥ तस्यानुष्ठानमात्रेणसर्वपापैःप्रमुच्यते ॥ १० ॥

भाद्रपद शुद्ध तृतीयातिथि हस्तनक्षत्रयुक्त असली ह्मणजे त्या दिवशीं हें व्रत केलें असतां सर्व पापांपासून मनुष्य मुक्त होतो ॥ १० ॥

शृणुदेवित्वयापूर्वंयद्व्रतंचरितंमहत् ॥ तत्सर्वंकथयिष्यामियथावृत्तंहिमालये ॥ ११ ॥

हे देवि, पूर्वीं जें मोठें व्रत त्वां आचरिलें व हिमालयावर जें वर्तमान घडलें, तें सर्व तुला कथन करितों ११

पार्वत्युवाच ॥ ॥ कथंकृतंमयानाथ व्रतानामुत्तमं व्रतम् ॥
तत्सर्वंश्रोतुमिच्छामि त्वत्सकाशान्महेश्वर ॥ १२ ॥

पार्वती ह्मणाली--हे नाथ, सर्व व्रतांमध्यें उत्तम असें जें व्रत तें मीं कसें केलें हें आपल्यापासून सर्व ऐकण्याची इच्छा करितें ॥ १२ ॥

॥ शिवउवाच ॥ ॥ अस्तितत्रमहादिव्यो हिमवान्नगउत्तमः ॥
नानाभूमिसमाकीर्णोनानाद्रुमसमाकुलः ॥ १३ ॥

शंकर ह्मणाला--पृथ्वीवर हिमवान् नांवाचा श्रेष्ठ व अति सुंदर असा एक पर्वत आहे, तो अनेक प्रकारच्या भूमींनीं युक्त असून नानाप्रकारच्या वृक्षांनीं व्याप्त आहे ॥ १३ ॥

नानापक्षिसमायुक्तोनानामृगविचित्रितः ॥ यत्रदेवाःसगंधर्वाःसिद्धचारणगुह्यकाः ॥ १४ ॥

व नानाप्रकारच्या पक्ष्यांनीं युक्त असून अनेक प्रकारच्या मृगांनीं चित्रविचित्र दिसत आहे तेथें गंधर्वासहवर्तमान इंद्रादि देव व सिद्ध, चारण, गुह्यक हे ॥ १४ ॥

विचरंतियथादेविगंधर्वध्वनिसंकुलाः ॥ स्फाटिकैःकांचनैःशृंगैर्वैदूर्यमणिभूषितैः ॥ १५ ॥

गंधर्वांच्या गायनाच्या मधुरध्वनीनें युक्त होत्साते चहूंकडे संचार करिताहेत. आणि हे देवि, वैडूर्यमण्यांनीं सुशोभित असा स्फटिकमय व सुवर्णमय शिखररूपी ॥ १५ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भुजैर्लिखन्निवाकाशंसुहृदोमंदिरंयथा ॥ हिमेनपूरितोनित्यंगंगाध्वनिविनादितः ॥ १६ ॥

भुजांनीं आकाशरूपभिंतीस जणू चित्रवीतच आहे काय? असा अत्यंत उंच व राहण्यासकेवळ मित्रमंदिरासारखा आनंददायक, नेहमीं बर्फानें आच्छादलेला, गंगेच्या ध्वनीनें नादयुक्त असणारा असा तो हिमवान् पर्वत आहे १६

पार्वतित्वंयथाबाल्येपरमाचरतीतपः ॥ अब्दद्वादशंकदेविधूम्रपानमधोमुखी ॥ १७ ॥

हे पार्वति, अशा त्या पर्वतावर त्वां लहानपणीं मोठें उत्कृष्ट तप केलें. तें असें कीं, बारा वर्षेंपर्यंत अधोमुख राहून धूम्रपान केलें ॥ १७ ॥

संवत्सरचतुःषष्टिपक्वपर्णाशनंकृतम् ॥ माघमासेजलेमग्ना वैशाखेचाग्निसाधिनी ॥ १८ ॥

नंतर चौसष्ट वर्षेंपर्यंत झाडांचीं पिकलेलीं पानें खाऊन राहिलीस माघमहिन्यांत उदकांत मग्न होऊन रहावें, वैशाखांत पंचाग्निसाधन करावें ॥ १८ ॥

श्रावणेचबहिर्वासाअन्नपानविवर्जिता ॥ दृष्ट्वातानेनतत्कष्टंचिंतयादुःखितोऽभवत् ॥ १९ ॥

पावसाळ्यांत अन्नोदक सोडून उघड्यावर बसावें; याप्रमाणें कित्येक वर्षें गेलीं तेव्हां तुझा पिता हिमाचल परकष्टकारक असें तें तुझें तप पाहून चिंताक्रांत होऊन मोठा दुःखित झाला ॥ १९ ॥

कस्मैदेयामयत्कन्याएवंचिंतातुरोभवत् ॥ तदैवांबरतःप्राप्तोब्रह्मपुत्रस्तुधर्मवित् ॥ २० ॥

आणि आतां म्यां ही आपली कन्या कोणाला द्यावी अशी काळजी करूं लागला, तेव्हां मोठा धर्मवेत्ता ब्रह्मदेवाचा पुत्र नारद हा तेथें एकाएकीं आकाशमार्गानें आला ॥ २० ॥

नारदोमुनिशार्दूलःशैलपुत्रीदिदृक्षया ॥ दत्वार्घ्यविष्टरंपाद्यंनारदायोक्तवान्गिरिः ॥ २१ ॥

मुनिश्रेष्ठ नारद आपल्या मुलीस पाहण्याच्या हेतुनें आला, हें पाहून हिमाचल त्याला आसन, अर्घ्य, पाद्य इत्यादि उपचार अर्पण करून सत्कारपूर्वक बोलला ॥ २१ ॥

॥ हिमवानुवाच ॥ किमर्थमागतःस्वामिन् वदस्वमुनिसत्तम ॥
महद्भाग्येनसंप्राप्तंत्वदागमनमुत्तमम् ॥ २२ ॥

हिमाचल ह्मणतो–हे स्वामिन् ऋषिश्रेष्ठा, आज आपण कोणत्या हेतूनें येथें आला तें मला सांगा. आज माझें मोठें भाग्य उदय पावलें ह्मणून येथें हे आपले उत्तम आगमन झालें ॥ २२ ॥

॥ नारदउवाच ॥ शृणुशैलेंद्रमद्वाक्यं विष्णुनाप्रेषितोस्म्यहम् ॥
योग्यंयोग्यायदातव्यं कन्यारत्नमिदंत्वया ॥ २३ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हिमाचलाचे भाषण ऐकून नारद ह्मणाला--गिरिराजा,मी कां आला तें सांगतों; श्रवण कर, मला भगवान् विष्णूनें पाठविलें आहे.कारण कीं,योग्य पुरुषाला योग्य वस्तु द्यावी हें अवश्य आहे; तेव्हां स्त्रियांत रत्नभूत जी ही तुझी योग्य कन्या ही त्वां योग्यालाच द्यावी ॥ २३ ॥

वासुदेवसमोनास्तिब्रह्मविष्णुशिवादिषु ॥ तस्मैदेयात्वयाकन्याह्यत्रार्थेसंमतंमम ॥ २४ ॥

ब्रह्मा शिव इत्यादि देवांमध्येंही वासुदेवासारखा कोणीच नाहीं. याकरितां त्वां ही कन्या त्याला द्यावी असें मला वाटतें ॥ २४ ॥

हिमवानुवाच ॥ वासुदेवःस्वयंदेवः कन्यांप्रार्थयतेयदि ॥
तदामयाप्रदातव्यात्वदागमनगौरवात् ॥ २५ ॥

नारदाचें वाक्य ऐकून हिमवान् ह्मणाला-सर्व देवांत भगवान् वासुदेव स्वतः माझी कन्या मागतो आणि आपण असें करावें ह्मणून ह्मणतां तर मला तसेंच केलें पाहिजे ॥ २५ ॥

इत्येवंगदितंश्रुत्वानभस्यंतर्दधेमुनिः ॥ ययौपीतांबरधरंशंखचक्रगदाधरम् ॥
कृतांजलिपुटोभूत्वामुनींद्रस्तमभाषत ॥ २६ ॥

याप्रमाणें हिमाचलाचें वचन ऐकून नारदऋषि तेथल्या तेथेंच आकाशांत गुप्त होऊन, पीतांबर नेसलेला व शंख-चक्रादि आयुधांनीं विराजित अशा भगवान् विष्णूजवळ गेला आणि हात जोडून सांगूं लागला ॥२६॥

॥ नारदउवाच ॥ ॥ शृणुदेवभवत्कार्यं विवाहो निश्चितस्तव ॥
इत्युक्त्वानारदोवाक्यं तत्रैवांतरधीयत ॥ २७ ॥

नारद ह्मणाला-भगवन्, म्यां तुमचें कार्य केलें तें ऐका; तुमच्या विवाहाचा निश्चय करून आलों आहे. याप्रमाणें विष्णूला सांगून नारद तेथेंच गुप्त झाला ॥ २७ ॥

हिमवांस्तुतदागौरीमुवाचवचनंमुदा ॥ दत्तासित्वंमयापुत्रिदेवेतुगरुडध्वजे ॥ २८ ॥

इकडे हिमाचल मोठ्या आनंदानें आपल्या कन्येस ह्मणाला-मुली तुला भगवान् गरुडध्वज विष्णु याला द्यावें असा मी निश्चय केला आहे ॥ २८ ॥

श्रुत्वावाक्यंपितुर्देवीगतासासखिमंदिरम् ॥ भूमौपतित्वासातत्रविललापापि
दुःखिता ॥ विलपंतींतदादृष्ट्वासखीवचनमब्रवीत् ॥ २९ ॥

असें बापाचें बोलणें ऐकून ती आपल्या सखीच्या घरीं गेली आणि तेथें अत्यंत दुःखित होत्साती भूमीवर आंग टाकून विलाप करूं लागली, तेव्हां तिची सखी तिला ह्मणाली ॥ २९ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ सख्युवाच ॥ किमर्थंदुःखितादेवि कथयस्वममाग्रतः ॥
यद्भवत्याभिलषितं करिष्येहंनसंशयः ॥ ३० ॥

सखी ह्मणते हे देवि, तूं अशी कां दुःखित झाली आहेस तें मला सांग. जै तुझ्या मनांत इष्ट असेल तें मी साधून देईन; यांत कांहीं संशय नाहीं ॥ ३० ॥

॥ पार्वत्युवाच ॥ सखिश्रृणुममप्रीत्या मनोभिलषितंमया ॥
महादेवंचभर्तारं करिष्येहंनसंशयः ॥ ३१ ॥

पार्वती ह्मणाली-सखे, तूं मजवर फार लोभ करितेस, तेव्हां माझ्या मनांत कोणती गोष्ट आली आहे ती मी तुला सांगते. मी महादेवालाच पति करावा असा माझा निश्चय आहे ॥ ३१ ॥

एतन्मोचिंतितंकार्यंतातेनकृतमन्यथा ॥ तस्माद्देहपरित्यागंकरिष्येहंसखिप्रिये ॥ ३२ ॥

असें असून माझें चिंतित कार्य माझ्या पित्यानें अन्यथा केलें, ह्मणून मी आतां ह्या देहाचा त्याग करित्यें ॥३२॥

पार्वत्यावचनंश्रुत्वासखावचनमब्रवीत् ॥
॥ सख्युवाच ॥ पितायत्रनजानातिगमिष्यावोहितद्वनम् ॥ ३३ ॥

पार्वतीचें भाषण ऐकून सखी ह्मणाली-तुझ्या पित्याला जो प्रदेश माहित नाहीं अशा अरण्यांत आपण जाऊं ह्मणजे झालें ॥ ३३ ॥

इत्येवंसंमतंकृत्वानीतासित्वंमहद्वनम् ॥ पितानिरीक्षयामासहिमवांस्तुगृहेगृहे ॥ ३४ ॥

हे प्रिये, याप्रमाणें तुह्मीं दोघीनीं एक विचार केला व त्या सखीनें तुला एका मोठ्या अरण्यांत नेलें. इकडे तुझा पिता हिमाचल घराघर फिरून तुझा शोध करूं लागला ॥ ३४ ॥

केननीतास्तिमेपुत्रीदेवदानवकिन्नरैः ॥ नारदाग्रेकृतंसत्यंकिंदास्येगरुडध्वजे ॥ ३५ ॥

आणि मनांत ह्मणूं लागला कीं, माझी मुलगी कोणी देवांनीं किंवा दानवांनीं किंवा किन्नरांनीं नेली असावी ? मी ती विष्णूला देण्याचें नारदाजवळ कबूल केलें आहे. आतां विष्णुला काय द्यावें ! ॥ ३५ ॥

इत्येवंचिंतयाविष्टोमूर्छितोनिपपातह ॥ हाहाकृत्वाप्रधावंतिलोकास्तेगिरिपुंगवम् ॥ ३६ ॥

याप्रमाणें चिंताकुल होऊन तुझा पिता मूर्च्छित होऊन पडला, तेव्हां लोक हाहाकार करून हिमाचलाजवळ धांवत आले ॥ ३६ ॥

ऊचुर्गिरिवरंसर्वेमूर्च्छाहेतुंगिरेवद ॥
॥ गिरिरुवाच ॥ दुःखस्यहेतुंश्रृणुत कन्यारत्नंहृतंमम ॥ ३७ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आणि त्यास ह्मणाले कीं महाराज, आपल्याला एकाएकीं अशी मूर्च्छा आली याचें कारण काय तें सांगा हिमाचल ह्मणाला-लोकहो मला असह्य दुःख झालें याचें कारण ऐका. आज माझें कन्यारत्न हरवलें ॥३७॥

दष्टावाकालसर्पेणींसहव्याघ्रेणवाहता ॥ नजानेक्वगतापुत्रीकेनदुष्टेनवाहृता ॥ ३८ ॥

तिला कालसर्पानें दंश केला किंवा सिंह अथवा वाघ यांनीं तिला मारिलें अथवा ती आपण होऊन कोठें गेली किंवा कोणी दुष्टानें तिला पळवून नेलें हें कांहीं समजत नाहीं ॥ ३८ ॥

चकंपेशोकसंतप्तोवातेनेवमहातरुः ॥ गिरिर्विनाद्धनंयातस्तदालोकनकारणात् ॥ ३९ ॥

याप्रमाणें दुःखाचें कारण सांगून जसा मोठ्या वाऱ्यानें वृक्षकांपतो, तसा त्या दुःखानें हिमाचल कांपूं लागला आणि मुलीला शोधण्याकरितां एका अरण्यांतून दुसऱ्या अरण्यांत असा फिरूं लागला शोध करीत जों चालला ३९

सिंहव्याघ्रैश्चभल्लैश्चरोहिभिश्चमहावनम् ॥ त्वंचापिपिनेघोरेव्रजंतीसखिभिःसह ॥ ४० ॥

तों जातां जातां सिंह, व्याघ्र, अस्वलें, मृग, यांनीं व्याप्त अशा अरण्यांत येऊन पोंचला, इकडे तूंही सखीसहवर्तमान घरांतून जी निघालीस, ती जातां जातां मोठ्या घोर अरण्यांत आलीस ॥ ४० ॥

तत्रदृष्ट्वानदींरम्यांतत्तीरचमेहागुहाम् ॥ तांप्रविश्यसखीसार्धमन्नभोगविवर्जिता ॥ ४१ ॥

तों तेथें एक रम्य नदी तुझ्या दृष्टीस पडली. तिच्या कांठीं एक मोठी गुहा होती, त्या गुहेंत तूं सखीसहवर्तमान प्रवेश करून अन्न पाणी इत्यादि सर्व भोग वर्ज्य करून ॥ ४१ ॥

संस्थाप्यवालुकालिंगंपार्वत्यासहितंमम ॥ भाद्रपदशुक्लतृतीयामर्चयंतीतुहस्तमे ॥ ४२ ॥

तेथें आपणासहित माझें वाळूचें लिंग स्थापून त्वां माझें पूजन केलेंस. त्यादिवशीं भाद्रपद मासांतील शुक्ल तृतीया होती व हस्तनक्षत्र होतें ॥ ४२ ॥

---

१ येथें चरित्र :महादेव पार्वतीला ही कथा सांगत असून पार्वतीसहवर्तमान तूं माझें पूजन केलेंस, असें ह्मटलें याविषयीं कोणालाही शंका येईल, पण वस्तुतः शंकेला मुळींच अवसर नाहीं; कारण, भगवान् शंकर अनंत व अविनाशी; आजपर्यंत शेंकडों प्रलय होऊन पुनः सृष्टि झाली आहे. हा सृष्टिप्रलयाचा क्रम एवसारखा चालला आहे. तेव्हां प्रत्येक सृष्टींत भगवान् शंकर आपलें सगुणरूप धारण करून पार्वतीसह क्रीडा करितात ह्मणून पूर्वसृष्टींतला सांप्रत आपला आपणच इतिहास सांगत आहेत असें समजावें. प्रत्येक कल्पारंभीं सर्वज्ञ परमेश्वर प्रथम ब्रह्मा, विष्णु, शिव अशीं रूपें घेतों असें पुराणमत आहे. ह्याप्रमाणें शिवाला पूर्वकल्प वृत्त सर्वदा ज्ञात आहे. त्यामुळें ही पूर्वकल्पांतील कथा पार्वतीला सांगितली असें मानतात.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तत्रवाद्येनगीतेरानरात्रौजागरणंकृतम् ॥ व्रतराजप्रभावेनआसनंचलितंमम ॥ ४३ ॥

रात्रीं तेथेंगीतवाद्यें यांनींयुक्तत्वांजागरण केलें,याप्रमाणें त्वांव्रतकेलें त्याच्याप्रभावानेंयथेंमाझें आसनहाललें४३

सं प्राप्तोऽहंतदातत्रयत्रत्वंसखिभिःसह ॥ प्रसन्नोऽस्मिमयाप्रोक्तंवरंब्रुहिवरानने ॥ ४४ ॥

ते व्हां सख्यांसहवर्तमान तूं जेथें तप करीत बसली होतीस तेथें अकस्मात् मी प्राप्त झालों आणि तुला ह्मणालों कीं, हे वरानने, मी तुला प्रसन्न झालों आहें. वर तूं पाहिजे तो वर माग ॥ ४४ ॥

पार्वत्युवाच ॥ ॥ यदिदेवप्रसन्नोऽसिभर्तामेभवमहेश्वर ॥

॥ तथेत्युक्त्वातुसंप्राप्तोकैलासपुनरेवच ॥ ४५ ॥

तेव्हां तूं ह्मणालीस, हे देवा महेश्वरा, जर तूं प्रसन्न झाला आहेस तर तूं माझा पति हो, असें तूं बोललीस तेव्हां मी, फार चांगलें आहे असें ह्मणून पुनः कैलासपर्वतीं आलों ॥ ४५ ॥

ततःप्रभातेसंप्राप्तेनद्यांकृत्वाविसर्जनम् ॥ पारणंतुकृतंतत्रसख्यासार्धंत्वयाशुभे ॥ ४६ ॥

नंतर प्रातःकाल होतांच त्वां नंदींत माझ्या लिंगाचें विसर्जन करून, सखीसहवर्तमान आरंभिलेल्या व्रताचें तेथेंच पारणें केलें ॥ ४६ ॥

हिमवानपितंदेशमाजगामघनंवनम् ॥ चतुराशानिरिक्षंतुविव्हलःपतितोभुवि ॥ ४७ ॥

हिमाचलही तुझा शोध करीत करीत त्या गहन अरण्यांत आला आणि चहूंकडे पाहूं लागला; परंतु त्याला तूं दृष्टीस न पडल्यामुळें विव्हळ होऊन तो भूमीवर पडला ॥ ४७ ॥

दृष्ट्वातत्र नदीतीरेप्रसुप्तंकन्यकाद्वयम् ॥ उत्थाप्योत्संगमारोप्यरोदनंकृतवान्गिरिः ॥ ४८ ॥

कांहीं वेळानें पुनः तुझा शोध करीत पुढें निघाला, तों नदीच्या तीरीं दोन मुली निजलेल्या त्याच्या दृष्टीस पडल्या. तेव्हां त्यांस उठवून मांडीवर घेऊन तो रडूं लागला ॥ ४८ ॥

सिंहव्याघ्राहिभल्लूकैर्वनेतुष्टेकुतःस्थिता ॥

॥ पार्वत्युवाच ॥ शृणुतातमयाज्ञातंत्वंदास्यसीश्वरायमाम् ॥ ४९ ॥

आणि ह्मणाला कीं, मुली ! सिंह, वाघ, सर्प, अस्वलें इत्यादिकांनीं भयंकर अशा या घोर अरण्यांत तूं कां येऊन राहिलीस ? पित्याचा प्रश्न ऐकून पार्वती ह्मणाली, बाबा ! ऐक तूं माझा शंकराशीं विवाह करशील असें मीं पूर्वीं जाणलें होतें ॥ ४९ ॥

तदन्यथाकृतंताततेनाहंवनमागता ॥ ददासितातयदिमामीश्वरायतदागृहम् ॥ ५० ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पण त्वां पूर्वीचा बेत फिरविला ह्मणून मी वनांत आल्यें. बाबा जर तूं मला शंकराला अर्पण करशील तर मी घरीं येइन ॥ ५० ॥

आगमिष्यामिनैवंचेदिहस्थास्यामिनिश्चितम्॥तथेत्युक्त्वाहिमवतानीतासित्वंगृहंप्रति। ५१।

नाहीं तर येथेंच रहावें असा माझा नियम झाला आहे. पित्यानें तुझ्या ह्मणण्याप्रमाणें करतों असें सांगून तुला घरीं नेलें ॥ ५१ ॥

पश्चाद्दत्तात्वमस्माकंकृत्वावैवाहिकींक्रियाम् ॥ तेनव्रतप्रभावेनसौभाग्यंसाधितंत्वया ॥५२॥

नंतर त्यानें यथाविधि विवाह करून तुला मजकारणें अर्पण केलें. तात्पर्य कीं, जें त्वां व्रत केलें त्याच्या प्रभावानें त्वां सौभाग्य मिळविलें ॥ ५२ ॥

अद्यापिव्रतराजस्तुनकस्यापिनिवेदितः ॥ नामास्यव्रतराजस्यश्रृणुदेवियथाऽभवत् ॥ ५३॥

हें उत्तम व्रत अद्यापि कोणालाही सांगितलें नाहीं. हे देवि, ह्या व्रताचें नांव कसें झालें तें तुला सांगतो ऐक ॥ ५३ ॥

आलिभिर्हरितायस्मात्तस्मात्साहरितालिका ॥

॥ देव्युवाच ॥ नामेदंकथितंदेव विधिंवदममप्रभो ॥ ५४ ॥

आलि ह्मणजे सख्या त्यांनीं तुझें हरण केलें ह्मणजे तुला दूर नेलें ह्मणून या व्रताला 'हरितालिका' असें नांव पडलें. याप्रमाणें महादेवाचें भाषण ऐकून पार्वती ह्मणाली–भगवन् आपण ह्या व्रताचें नांव सांगितलें पण याचा विधि कृपा करून मला सांगा ॥ ५४ ॥

किंपुण्यंकिंफलंचास्यकेनचक्रियतेव्रतम् ॥

॥ ईश्वर उवाच ॥ श्रृणुदेविविधिंवक्ष्येनारीसौभाग्यहेतुकम् ॥ ५५

आणि या व्रतापासून कोणतें पुण्य व काय फल मिळतें आणि हें व्रत कोणीं करावें तें मला सांगा. पार्वतीचा प्रश्न ऐकून महादेव ह्मणाले–हे देवि, मी या व्रताचा विधि सांगतों तो ऐक ॥ ५५ ॥

करिष्यतिप्रयत्नेनयदिसौभाग्यमिच्छती ॥ तोरणादिप्रकर्तव्यकर्दलीस्तंभमंडीतम् ॥ ५६ ॥

हें व्रत स्त्रियांच्या सौभाग्यास कारण आहे ह्मणून सौभाग्य इच्छिणाऱ्या स्त्रियांनीं करावें. केळींच्या खांबांनीं सुशोभित असें तोरण लावून मखर करावें ॥ ५६ ॥

आच्छाद्यपट्टवस्त्रैस्तुनानावर्णविचित्रितैः ॥ चंदनेनसुगंधेनलेपयेद्गृहमंडपम् ॥ ५७ ॥

छत लावून चित्रविचित्र रंगांच्या उत्तम उत्तम पट्टवस्त्रांनीं सुशोभित करावें, सुवासिक चंदनानें तें मखर सुगंधित करावें ॥ ५७ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शंखभेरीमृदंगैस्तुकारयेद्बहुनिःस्वानान् ॥ नामामंगलगीतंचकर्तव्यंममसद्मनि ॥ ५८ ॥

शंक, चौघडा, नगारा, मृदंग इत्यादि वाद्यांचा गजर करून त्या माझ्या पूजेच्या ठिकाणीं नानाप्रकारचें मंगल गीत गावें ॥ ५८ ॥

स्थापयेद्वालुकालिंगंपार्वत्यासहितंमम ॥ पूजयेद्बहुपुष्पैश्चगंधधूपादिभिर्नवैः ॥ ५९ ॥

नंतर पार्वतीसह माझी वाळुकेची मूर्ति करून, नवीन अशा गंध, धूप, फळ, पुष्प इत्यादि उपचारांनीं माझें पूजन करावें ॥ ५९ ॥

नानाप्रकारैर्नैवेद्यैःपूजयेज्जागरंचरेत् ॥ नारिकेलैःपूगफलैर्जंबीरैर्बहुभिस्तथा ॥ ६० ॥

नानाप्रकारचे नैवेद्य अर्पण करावे. रात्रीं जागरण करावें, नारळ, सुपाऱ्या, अनेक प्रकारचीं लिंबें ॥ ६०॥

बीजपूरैः सनारिंगैःफलैश्चान्यैश्चभूरिशः ॥ ऋतुकालोद्भवैर्भूरिप्रकारैःकंदमूलकैः॥ ६१ ॥

पेरू, महाळुंगें, नारिंगें इत्यादि अनेक जीं त्या ऋतूंत उत्पन्न झालीं असतील तीं उत्तम फळें व नाना-प्रकारचीं कंदमुळें मला अर्पण करावीं ॥ ६१ ॥

गंधपुष्पैर्धूपदीपैर्मंत्रेणानेनपूजयेत् ॥ पूजामंत्रः॥नमःशिवायशांतायपंचवक्त्रायशूलिने॥६२॥

आणि चंदन, पुष्पे, धूप, दीप इत्यादि उपचार पुढें सांगितलेल्या मंत्रानें अर्पण करावे ॥मंत्रार्थः॥ ज्याचें स्वरूप शांत,ज्याला पांच मुखें आहेत, ज्यानें हातांत शूल धारण केला आहे,अशाशिवाला नमस्कार असो॥६२॥

नंदिभृंगिमहाकालगणयुक्तायशंभवे ॥ शिवायैहरकांतायैप्रकृत्यैसृष्टिहेतवे ॥ ६३ ॥

नंदी, भृंगी, महाकाल इत्यादि सेवकगण ज्याच्या जवळ आहेत अशा भगवान् शंभूला नमस्कार असो. जी मंगलरूपिणी शंकराची प्रिया, कृतिरूप व सृष्टिकारण ॥ ६३ ॥

शिवायैसर्वमांगल्यैशिवरूपेजगन्मये ॥ शिवकल्याणदेनित्यंशिवरूपेनमोस्तुते ॥ ६४ ॥

कल्याणरूप, सर्व मंगलरूपशिवरूप व सर्व जगाला व्यापून राहणारी,नित्य कल्याण देणारी, शिवरूपिणी देवि ! तुला नमस्कार असो ॥ ६४ ॥

भवरूपेनमस्तुभ्यंशिवायैसततंनमः ॥ नमस्तेब्रह्मरूपिण्यैजद्धात्र्यैनमोनमः ॥ ६५ ॥

हा संसार हेंच जिचें रूप आहे अशी जी तूं शिवा, त्या तुला सतत नमस्कार असो. ब्रह्मरूप जी तूं त्या तुला नस्कार असो, जगाचें पालन करणारी जी तूं त्या तुला पुनः पुनः नमस्कार असो ॥ ६५ ॥

संसारभयसंतापात्राहिमांसिंहवाहिनि ॥ येनकामेमदेवित्वं पूजितासिमहेश्वरि ॥ ६६ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हे सिंहवाहिनी देवि, संसाराच्या भयानें जो संताप होतो त्यापासून माझें रक्षण कर. हे महेश्वरि देवि, ज्या इच्छेनें मीं तुझें पूजन केलें आहे ती माझी इच्छा पूर्ण कर ॥ ६६ ॥

राज्यसौभाग्यसंपत्तीर्देहिमामबपार्वति ॥ इतिपूजामंत्रः ॥
मंत्रेणानेनदेवित्वांपूजयित्वामयासह ॥ ६७ ॥

हे आई पार्वती, राज्य, सौभाग्य, संपत्ति हीं मला दे हे पार्वती, या मंत्रानें मजसहवर्तमान तुझी पूजा करावी ६७

कथांश्रुत्वाविधानेदद्यादन्नंचभूरिशः ॥ ब्राह्मणेभ्योयथाशक्तिदेयावस्त्रहिरण्यगाः ॥ ६८ ॥

नंतर यथाविधि कथा श्रवण करावी. अन्नदान पुष्कळ करावे. ब्राह्मणाला वस्त्रें, हिरण्य गाई इत्यादि यथाशक्ति द्यावीं ॥ ६८ ॥

अन्येषांभूयसीदेयास्त्रीणांवाभूषणादिकम् ॥ भर्त्रासहकथांश्रुत्वाभक्तियुक्तेनचेतसा ॥ ६९ ॥

इतर ब्राह्मणांला भूयसी दक्षिणा द्यावी. स्त्रियांला अलंकार द्यावे. भर्त्याबरोबर वर्तमान भक्तियुक्त अंतःकरणानें माझी कथा श्रवण करावी ॥ ६९ ॥

कृत्वाव्रतेश्वरंदेविसर्वपापैःप्रमुच्यते ॥ सप्तजन्मभवेद्राज्यंसौभाग्यंचैववर्धते ॥ ७० ॥

याप्रमाणें हें उत्तम व्रत यथाविधि केलें असतां, सर्व पापांपासून मुक्त होऊन सप्तजन्मपर्यंत राज्य मिळतें व सौभाग्याची वृद्धि होते ॥ ७० ॥

तृतीयायांतुयानारीआहारंकुरुतेयदि ॥ सप्तजन्मभवेद्वंध्यावैधव्यंजन्मजन्मनि ॥ ७१ ॥

भाद्रपदशुद्ध तृतीयेला जर कोणी स्त्री आहार करील, तर सातजन्मपर्यंत वंध्या होईल व तिला प्रत्येक जन्मीं वैधव्य प्राप्त होईल ॥ ७१ ॥

दारिद्र्यंपुत्रशोकंचकर्कशादुःखभागिनी ॥ पच्यतेनरकेघोरेनोपवासंकरोतिया ॥ ७२ ॥

दारिद्र्य येईल, पुत्रशोक होईल, स्वभावानें अत्यंत कर्कशा होऊन अंतीं दुःखी होईल. जी उपवास करणार नाहीं ती भयंकर नरकांत पडेल ॥ ७२ ॥

राजतेकांचनेताम्रेवैणवेचाथमृन्मये ॥ भाजनेविन्यसेदन्नंसवस्त्रफलदक्षिणम् ॥
वायनेद्विजवर्यायद्यादंतेचपारणाम् ॥ ७३ ॥

दुसरे दिवशीं पारण्याचे वेळीं सोन्याचें, रुप्याचें, तांब्याचें, वेळूचें अथवा मातीचें जसें जिला अनुकूल असेल तसें पात्र घेऊन त्यांत डाळ, तांदूळ वगैरे भोजनाचे पदार्थ घालून वस्त्र, फळें व दक्षिणा यांसह तें वायन उत्तम ब्राह्मणाला दान करावें आणि नंतर पारणें करावें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

एवंविधियाकुरुतेचनारीत्वयासमानारमतेचभर्त्रा ॥
भोगाननेकान्भुविभुज्यमानान्सायुज्यमंतेलभतेहरेण ॥ ७४॥

पार्वती, याप्रमाणें जी स्त्री हें व्रत करील ती तुझ्यासारखी आपल्या भर्त्यासह रममाण होईल व इहलोकीं अनेक उत्तम भोग भोगून अंतीं शंकराचें सायुज्य तिला प्राप्त होईल ॥ ७४ ॥

अश्वमेधसहस्राणिवाजपेयशतानिच ॥ कथाश्रवणमात्रेणतत्फलंप्राप्यतेनरैः ॥ ७५ ॥

हजारों अश्वमेध व शेंकडों वाजपेय यज्ञ केल्यानें जें फल प्राप्त व्हावयाचें तें ह्या कथाश्रवणाच्या योगानें मनुष्यांला प्राप्त होतें ॥ ७५ ॥

एतत्तेकथितंदेवितवाग्रेव्रतमुत्तमम् ॥ कोठियज्ञकृतंपुण्यमस्यानुष्ठानमात्रतः ॥ ७६ ॥
इतिश्रीभविष्योत्तरपुराणेहरगौरीसंवादेहरितालिकाव्रतकथासमाप्त ॥

महादेव ह्मणतात–हे देवि, याप्रमाणें हें तुला उत्तम व्रत निवेदन केलें. केवळ ह्या व्रताच्या आचरणानें कोट्यवधि यज्ञ केल्याचें फल प्राप्त होतें ॥७६॥ इति श्रीभविष्योत्तरपुराणे हरगौरीसंवादे हारितालिकाव्रतकथायां महाराष्ट्रभाषावृत्तिः समाप्तिमगमत् ॥ श्रीगौरीहरार्पणमस्तु ॥ ॥ ॥ ॥ ॥

आरती सांबाची.

लवथवतीविक्राळाब्रह्मांडेंमाळा ॥ विषेंकंठकाळात्रिनेत्रींज्वाळा ॥ लावण्यसुंदरमस्तकींबाळा ॥ तेथुनियांजळनिर्मळवाहेझुळझुळां ॥ जयदेवजयदेवजयश्रीशंकरा ॥ आरतीओंवाळूंतुजकर्पूरगौरा ॥ धृ० ॥ १ ॥ कर्पुरगौरभोळानयनींविशाळा ॥ अर्धांगींपार्वतीसुमनांच्यामाळा ॥ विभुतीचेंउधळणशितिकंठनीळा ॥ ऐसाशंकरशोभेउमावेल्हाळा॥२॥ देवोंदैत्यींसागरमंथनपैंकेलें ॥ त्यामाजीअवचितहळाहळसांपडलें ॥ तेंत्वांअसुरपणेंप्राशन केलें ॥ नीलकंठनामप्रसिद्धझालें ॥३ ॥ व्याघ्रांबरफणिवरधरसुंदरमदनारी ॥ पंचाननमनमोहनमुनिजनसुखकारी ॥ शतकोटींचेंबीजवाचेउच्चारी ॥ रघुकुळतिलकरामदासाअंतरीं ॥ ४ ॥

प्रकाशक व मुद्रक—पंढरीनाथ विनायक पाठक. 'जगदीश्वर'
प्रेस गिरगांव गायवाडी घर नं. ९ मुंबई.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

इति

हरितालिकापूजा कथा

समाप्ता ।

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

[OrderDescription]
,CREATED=13.09.19 17:19
,TRANSFERRED=2019/09/13 at 17:23:59
,PAGES=21
,TYPE=STD
,NAME=S0001795
,Book Name=M-2226-HARITALIKA PUJA SARTH KATHA
,ORDER_TEXT=
,[PAGELIST]
,FILE1=00000001.TIF
,FILE2=00000002.TIF
,FILE3=00000003.TIF
,FILE4=00000004.TIF
,FILE5=00000005.TIF
,FILE6=00000006.TIF
,FILE7=00000007.TIF
,FILE8=00000008.TIF
,FILE9=00000009.TIF
,FILE10=00000010.TIF
,FILE11=00000011.TIF
,FILE12=00000012.TIF
,FILE13=00000013.TIF
,FILE14=00000014.TIF
,FILE15=00000015.TIF
,FILE16=00000016.TIF
,FILE17=00000017.TIF
,FILE18=00000018.TIF
,FILE19=00000019.TIF
,FILE20=00000020.TIF
,FILE21=00000021.TIF
,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection